# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ७
## सभावृत्तांत

दिनांक :- २१/०९/२०१६ वेळ :- दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक २१/०९/२०१६ रोजी दु. १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी | अध्यक्षा |
| २. | मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर | |
| ३. | मा. शमीम पठाण | |
| ४. | मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | |
| ५. | मा.चिंचवडेपाटील अश्विनी गजानन | |
| ६. | मा.को-हाळे अनंत सुभाष | |
| ७. | मा.जगताप विमलताई सुरेश | |
| ८. | मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा | |
| ९. | मा.बारणे निलेश हिरामण | |
| १०. | मा.बारणे झामाबाई बाळासाहेब | |
| ११. | मा.ओव्हाळ शेखर अशोक | |
| १२. | मा.पवार यमुनाताई रमणनाना | |
| १३. | मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश | |
| १४. | मा.कलाटे स्वाती मयुर | |
| १५. | मा.शरद माणिकचंद लुणावत | स्विकृत सदस्य |
| १६. | मा.गिरीष ज्ञानेश्वर शेडगे | स्विकृत सदस्य |

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.सुभाष माछरे – क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय, मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.देवण्णा गट्टुवार, - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.एम.एस.मोरे – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.विजया आंबेडकर – जेष्ठ वैदयकिय अधिकारी, थेरगांव रुग्णालय , मा.एम.एम.इनामदार, लेखाधिकारी , ब क्षेत्रीय कार्यालय , मा. मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य , मा..सी.एन.धानोरकर – स्थापत्य विभाग, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.एस.एन.वाघ – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.एकनाथ पाटील – उपअभियंता विदयुत विभाग, मा.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.राजेंद्र डुंबरे – उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.आ.कृ.ढवळे – उपअभियंता बांधकाम परवानगी विभाग, मा.एम.एम.तावरे – शाखा अभियंता जलनिसारण विभाग, श्री.के.डी.दरवडे – सहा.आरोग्याधिकारी, मा.आर.पी.कोतवाल - क्रिडा पर्यवेक्षक, क्रिडा विभाग, इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष सौ.आशाताई सुर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ६, दि. १०/८/२०१६ व दि.१९/८/२०१६ (तहकुब) रोजी झालेल्या प्रभाग समितीमध्ये ठराव क्रमांक ३४ विषय क्रमांक ३ अन्वये थेरगांव (गावठाण) पदमजी पेपर मिल प्रभाग क्रमांक ५० जगतापनगर भागातील डी मार्ट व एम.एम.शाळेशेजारील भुयारी मार्गला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे नामकरण करणेस वरिल क्रमांकाचे ठरावान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सदर प्रभाग क्रमांक ४९ मधील त्याच भुयारी मार्गास मा.ड प्रभाग समितीने ठराव ७, दिनांक ६/५/२०१६ अन्वये यापुर्वीच महाराष्ट्र भुषण डॉ.श्री नानासाहेब उर्फ नारायण विष्णु धर्माधिकारी असे नामकरण करणेचा ठराव मंजूर करणेत आलेला आहे. त्यामुळे सदरचा ठराव क्रमांक ३४ दिनांक १९/८/२०१६ रोजीचा ठराव दप्तरी दाखल करुन उर्वरित सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

**तदनंतर उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३ थेरगांव स.नं.३८ मधील रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये रस्ता घोषीत करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.झामाबाई बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४ पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्रमांक ५२ ताथवडे पुनावळे या प्रभागातील नागरीकांच्या मागणीनुसार माळवाडी येथील सावतामाळी मंदिराशेजारुन जाणा-या रस्त्यास व नवनाथ कुदळे यांचे घराजवळील रस्त्यास ह.भ.प.कै. भाऊसाहेब गणपत कुदळे पथ असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शेखर ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ मोरया गोसावी क्रिडांगणामध्ये परिसरातील नागरीकांसाठी वाचनालय मनपातर्फे चालु करण्यात आले असून, त्या वाचनालयास प्रबोधनकार ठाकरे असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अनंत को-हाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६ चिंचवड प्रभाग क्र.२२ मध्ये चिंचवड भाजीमंडईमध्ये जे मच्छिमार्केट आहे तेथील शिल्लक गाळयांमध्ये अपंग रोहीदास नामदेव जाधव, संदेश गोविंद मालवडकर व लतिफ पापाभाई मुलाणी, सुरज अरुण बेंद्रे, अभिषेक जिंतेंद् बेंद्रे, युवराज जिजाराम बेंद्रे व चंपा सोपान सुर्यवंशी, ज्योतिराम शंकर साळुंखे , सुजाता मधुकर सुर्यवंशी यांना १८ महिन्याच्या करारावर मनपाच्या अटी व शर्तीनुसार देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आश्विनी चिंचवडेपाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ भारताच्या स्वातंत्र्यपुर्व लढयामध्ये व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या विविध लढयामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील ज्या ज्या देशभक्तांनी व स्वातंत्र्य सैनिकांनी योगदान दिले त्यांचे स्मरणार्थ त्याची सुची चिंचवड येथील प्रभाग क्रमांक २२ पार्वती उदयान क्रांती स्फुर्ती ज्योत येथे लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी चिंचवडेपाटील यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ४४ विषय क्र. १

दि. २१/९/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक: मा.विमलताई सुरेश जगताप

संदर्भ :- मा.निलेश बारणे यांचा दिनांक १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ४९ स.नं.९ मधील बापूजीबुवानगर थेरगांव येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सुरु करण्यात येणा-या रुग्णालयाचे भुमिपूजन नुकतेच करण्यात आले या रुग्णालयाचा फायदा येथील स्थानिक गरजू रुग्णांना होणार आहे. तरी सदर रुग्णालयास हिंदूहदय सम्राट मा.बाळासाहेब ठाकरे स्मृति रुग्णालय असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४५ विषय क्र. २

दि. २१/९/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक: मा.विमलताई जगताप

संदर्भ :- मा. जयश्री वसंत गावडे यांचा दिनांक १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

ब प्रभाग कार्यालयाच्या उदघाटनाचा फोटो ब प्रभाग कार्यालयात लावणेकामीचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४६ विषय क्र. ३

दि. २१/९/२०१६ विभाग – नगररचना व विकास विभाग

सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा निलेश बारणे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे यांचा दिनांक २१/९/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

मा.ब प्रभाग समिती ठराव क्रमांक ८, दिनांक १२/५/२०१६ व ठराव क्रमांक २२, दिनांक १४/७/२०१६ अन्वये मौजे-थेरगांव नागरीकांसाठी खालील प्रमाणे नमुद केलेले रस्ते करणे आवश्यक आहे. १) कुणाल इस्टेट मनपा आरक्षणलगत २४ मी.डी.पी. रस्त्यापासून स.नं.३६ व ३७ मधून १२ मी.रस्ता करणे २) स.नं.१ व २ पासून नाल्याच्याकडेने मनपा आरक्षणपर्यंत स.नं.३८ पर्यंत ९. मी.रस्ता करणे. थेरगांव येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे १९९५ विकास मंजूर योजना पिंपरी चिंचवड मनपाचे नियोजन नियंत्रण १९९७ रोजी समाविष्ट करण्यात आलेल्या वरीलपैकी सर्व्हे नंबर .दाखविणेत आलेले नाही त्यामुळे भागातील शेतकरी व जमिन मालक यांना जागेवर जाण्याकरीता रस्ता उपलब्ध नसून अडचण होत आहे. त्यामुळे वरील नमुद केलेल्या २४ मी. रस्त्यापासून खेळाचे आरक्षणलगत पुढे नाल्यापर्यंत पुर्व पश्चिम १२ मी. रुंद तसेच स.नं.३६ पासून (नाल्यापासून ) स.नं.३८ मनपा आरक्षणपर्यंत उत्तर दक्षिण ९ मी. रस्ता करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत आलेली आहे. परंतु नागरीकांच्या सोयीसाठी व दळणवळणासाठी थेरगांव स.नं.३८ मधील रस्ते विकसन होणेचे दृष्टीने व मा.आयुक्त यांचे दिनांक २१/१२/२०१५ च्या स्थापत्य विभाग मंजूर प्रस्तावाप्रमाणे स.नं.३८ मधील ९ मी.रस्ता मनपा आरक्षणापासून मनपा शाळेच्या कडेने असलेल्या नाल्यावरुन रोझवुड हॉटेल ते थेरगांव गावठाण या २४ मी.रुंदी रस्त्यापर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०५ अन्वये रस्ता घोषीत करणेस आणि नियमानुसार याकामी हरकती व सुचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी तसेच

सदरचा विषय पुढील कार्यवाही करणेसाठी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस तसेच सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेसही मान्यता देणत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४७ विषय क्र. ४

दि. २१/९/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. शेखर ओव्हाळ अनुमोदक: मा यमुनाताई पवार

संदर्भ :- मा. शेखर ओव्हाळ यांचा दिनांक २१/९/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्रमांक ५२ ताथवडे पुनावळे या प्रभागातील नागरीकांच्या मागणीनुसार माळवाडी येथील सावतामाळी मंदिराशेजारुन जाणा-या रस्त्यास व नवनाथ कुदळे यांचे घराजवळील रस्त्यास ह.भ.प.कै. भाऊसाहेब गणपत कुदळे पथ असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदर विषय कायम होणेची वाट न पहाता तात्काळ मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४८ विषय क्र. ५

दि. २१/९/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. अनंत को-हाळे अनुमोदक: मा निलेश बारणे

संदर्भ :- मा. अनंत को-हाळे यांचा दिनांक २१/९/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

मोरया गोसावी क्रिडांगणामध्ये परिसरातील नागरीकांसाठी वाचनालय मनपातर्फे चालु करण्यात आले असून, त्या वाचनालयास प्रबोधनकार ठाकरे असे नांव देणेकामीच्या प्रस्तावाचा विचार पुढील सभेत करणेत यावा. .

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४९ विषय क्र. ६

दि. २१/९/२०१६ विभाग – ब क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभाग (भुमि आणि जिंदगी विभाग)

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा.ॲड.संदिप गुलाबराव चिंचवडे

संदर्भ :- मा. अश्विनी चिंचवडेपाटील यांचा दिनांक २१/९/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड प्रभाग क्र.२२ मध्ये चिंचवड भाजीमंडईमध्ये जे मच्छिमार्केट आहे तेथील शिल्लक गाळयांमध्ये अपंग रोहीदास नामदेव जाधव, संदेश गोविंद मालवडकर व लतिफ पापाभाई मुलाणी, सुरज अरुण बेंद्रे, अभिषेक जिंतेंद् बेंद्रे, युवराज जिजाराम बेंद्रे व चंपा सोपान सुर्यवंशी, ज्योतिराम शंकर साळुंखे , सुजाता मधुकर सुर्यवंशी यांना १८ महिन्याच्या करारावर मनपाच्या अटी व शर्तीनुसार देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५० विषय क्र. ७

दि. २१/९/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा.ॲड.संदिप गुलाबराव चिंचवडे

संदर्भ :- मा. अश्विनी चिंचवडेपाटील यांचा दिनांक २१/९/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

भारताच्या स्वातंत्र्यपुर्व लढयामध्ये व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या विविध लढयामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील ज्या ज्या देशभक्तांनी व स्वातंत्र्य सैनिकांनी योगदान दिले त्यांचे स्मरणार्थ त्याची सुची चिंचवड येथील प्रभाग क्रमांक २२ पार्वती उदयान क्रांती स्फुर्ती ज्योत येथे लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ५४५ /२०१६.
दिनांक : १५ / १० /२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना